श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

ऋषभ गीता तृतीय अध्याय(भा॰म॰5.3)



नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्
पञ्चम स्कन्धः
॥ तृतीयोऽध्यायः ॥

श्रीशुक उवाच
नाभिरपत्यकामोऽप्रजया मेरुदेव्या भगवन्तं(यँ)
यज्ञपुरुषमवहितात्मायजत ॥ 1॥

श्रीशुकाचार्य म्हणतात- नाभिराजाने भार्या मेरुदेवीसह पुत्रकामनेने एकाग्रतापूर्वक भगवान यज्ञपुरुषाचे पूजन केले.

तस्य ह वाव श्रद्धया विशुद्धभावेन यजतः(फ्) प्रवर्ग्येषु
प्रचरत्सु द्रव्यदेशकालमन्त्रर्त्विग्दक्षिणाविधानयोगो-
पपत्त्या दुरधिगमोऽपि भगवान् भागवतवात्सल्यतया

सुप्रतीक आत्मानमपराजितं(न्) निजजनाभिप्रेतार्थ-

विधित्सया गृहीतहृदयो हृदयङ्गमं(म्) मनोनयनानन्दना-

वयवाभिराममाविश्चकार ॥ 2॥

भगवान जरी द्रव्य, देश, काल, मंत्र, ऋत्विज, दक्षिणा आणि विधी, या साधनांनी संपन्न यज्ञाने प्राप्त होत नसले, तरी ते भक्तवत्सल असल्यामुळे जेव्हा नाभीने श्रद्धापूर्वक व विशुद्ध भावाने त्यांची आराधना केली, तेव्हा त्यांचे चित्त आपल्या भक्ताचा इच्छित हेतू साध्य करण्यासाठी उत्सुक झाले. त्यांचे स्वरूप जरी सर्वथैव स्वतंत्र असले, तरी त्यांनी प्रवर्ग्यकर्माचे अनुष्ठान सुरू होताच नाभीच्या मन आणि नेत्रांना आनंद देणाऱ्या अवयवांनी युक्त अशा अतिसुंदर हृदयाकर्षक रूपात स्वतःला प्रगट केले.

अथ ह तमाविष्कृतभुजयुगलद्वयं(म्) हिरण्मयं(म्) पुरुषविशेषं(ङ्)

कपिशकौशेयाम्बरधरमुरसि विलसच्छ्रीवत्सललामं(न्)

दरवरवनरुहवनमालाच्छूर्यमृतमणिगदादिभिरुपलक्षितं(म्)

स्फुटकिरणप्रवरमुकुटकुण्डलकटककटिसूत्रहारकेयूर-

नूपुराद्यङ्गभूषणविभूषितमृत्विक्सदस्यगृहपतयोऽधना

इवोत्तमधनमुपलभ्य सबहुमानमर्हणेनावनतशीर्षाण उपतस्थुः ॥ 3॥

त्यांनी रेशमी पीतांबर परिधान केला होता. वक्षःस्थळावर सुमनोहर श्रीवत्सचिन्ह शोभून दिसत होते. हातांमध्ये शंख, चक्र, गदा, पद्म, तसेच गळ्यात वनमाला आणि कौस्तुभ मणी शोभून दिसत होता. संपूर्ण शरीराच्या अंगप्रत्यंगांची कांती वाढविणाऱ्या किरणांनी आच्छादलेल्या मणिमय मुकुट, कुंडले, कंकण, कमरपट्टा, हार, बाजूबंद, नूपुर इत्यादी अलंकारांनी ते शोभून दिसत होते. परम तेजस्वी चतुर्भुजमूर्ती अशा पुरुषोत्तमांना प्रगट झालेले पाहून ऋत्विज, सदस्य आणि यजमान इत्यादी सर्व लोक, जसे निर्धन पुरुष धनराशी प्राप्त झाल्यावर अत्यंत आनंदित होतात, तसे आनंदित झाले. नंतर सर्वांनी मस्तक नमवून अत्यंत आदराने प्रभूची पूजा केली आणि त्यांची स्तुती केली.

ऋत्विज ऊचुः

अर्हसि मुहुरर्हत्तमार्हणमस्माकमनुपथानां(न्) नमो नम

इत्येतावत्सदुपशिक्षितं(ङ्) कोऽर्हति पुमान् प्रकृतिगुण-

व्यतिकरमतिरनीश ईश्वरस्य परस्य प्रकृतिपुरुषयो-

रर्वाक्तनाभिर्नामरूपाकृतिभी रूपनिरूपणम् ॥ 4॥

ऋषिजन म्हणाले – पूज्यतम, आम्ही आपले भक्त आहोत. आपण आम्हांला नेहमीच पूजनीय आहात. परंतु आम्ही आपली पूजा करणे काय जाणणार? आम्ही तर आपणांस वारंवार नमस्कार करतो. एवढेच आम्हांला महापुरुषांनी शिकविले आहे. आपण प्रकृती आणि पुरुष यांच्यापलीकडील आहात. तीन गुणांचे कार्य असलेल्या प्रपंचात बुद्धी गुंतल्याने आपले गुणगान करण्यास असमर्थ असलेला असा कोणता पुरुष आपल्या प्राकृत नाम, रूप आणि आकृतीच्याद्वारे साक्षात् परमेश्वर अशा आपल्या स्वरूपाचे निरूपण करू शकेल?

सकलजननिकायवृजिननिरसनशिवतमप्रवर-

गुणगणैकदेशकथनादृते ॥ 5॥

करायचेच झाले, तर सर्व लोकांचे दुःख निस्सरण करणाऱ्या आपल्या परम मंगलमय गुणांपैकी काही गुणांचेच वर्णन करू शकेल.

परिजनानुरागविरचितशबलसं(म्)शब्दसलिलसित-

किसलयतुलसिकादूर्वाङ्कुरैरपि सम्भृतया सपर्यया

किल परम परितुष्यसि ॥ 6॥

परंतु प्रभो, जरी आपल्या भक्तांनी प्रेम-सद्गद्गद वाणीने स्तुती करीत पाणी, पवित्र पाने, तुळशी, दूर्वा यांनी आपली पूजा केली, तरी आपण सर्व प्रकारे संतुष्ट होता.

अथानयापि न भवत ईज्ययोरुभारभरया समुचित-

मर्थमिहोपलभामहे ॥ 7॥

आम्हांला तर प्रेमाशिवाय या द्रव्य-कालादि अनेक अंगांच्या यज्ञाशी आपला काही संबंध आहे, असे वाटत नाही.

आत्मन एवानुसवनमञ्जसाऽव्यतिरेकेण बोभूयमा-

नाशेषपुरुषार्थस्वरूपस्य किन्तु नाथाशिष

आशासानानामेतदभिसं(म्)राधनमात्रं(म्) भवितुमर्हति ॥ 8॥

कारण आपल्या स्वतःपासूनच क्षणाक्षणाला जो सर्व पुरुषार्थांचे फलस्वरूप असा परमानंद स्वभावतःच नेहमी प्रगट होत असतो, त्याचे आपणच साक्षात् स्वरूप आहात. अशा प्रकारे आपल्याला जरी या यज्ञादिकांची काही अपेक्षा नसली, तरी अनेक प्रकारच्या कामनांच्या पूर्ततेची इच्छा करणाऱ्या आमच्यासाठी तर मनोरथसिद्धीचे योग्य साधन हेच आहे ना?

तद्यथा बालिशानां(म्) स्वयमात्मनः(श्) श्रेयः(फ्)

परमविदुषां(म्) परम परमपुरुष प्रकर्षकरुणया स्वमहिमानं(ञ्)

चापवर्गाख्यमुपकल्पयिष्यन् स्वयं(न्) नापचित एवेतरवदिहोपलक्षितः ॥ 9॥

आपण ब्रह्मदेवादि श्रेष्ठ देवांपेक्षाही श्रेष्ठ आहात. आमचे परम कल्याण कशात आहे, हे सुद्धा आम्ही जाणत नाही आणि आमच्याकडून आपली यथायोग्य पूजासुद्धा झाली नाही. तरीपण ज्याप्रमाणे ज्ञानी पुरुष न बोलावताच केवळ करुणाभावाने उद्युक्त होऊन अज्ञानी पुरुषांकडे जातात, त्याचप्रमाणे आपणसुद्धा आम्हांला आपले परमपद मोक्ष आणि आमच्या इच्छित वस्तू देण्यासाठी इतर यज्ञ इच्छिणाऱ्या देवतांप्रमाणे येथे प्रगट झाला आहात.

अथायमेव वरो ह्यर्हत्तम यर्हि बर्हिषि राजर्षेर्वरदर्षभो

भवान् निजपुरुषेक्षणविषय आसीत् ॥ 10॥

हे पूज्यतम, ब्रह्मदेवादि समस्त वर देणाऱ्यांमध्ये श्रेष्ठ असूनही आपण राजर्षी नाभीच्या या यज्ञशाळेत साक्षात् आमच्यासमोर प्रगट झाला आहात, हाच आपण आम्हांला सर्वश्रेष्ठ वर दिला आहे. आता आम्ही आणखी कोणता वर... मागावा ?

असङ्गनिशितज्ञानानलविधूताशेषमलानां(म्)

भवत्स्वभावानामात्मारामाणां(म्) मुनीनामनवरत-

परिगुणितगुणगणपरममङ्गलायनगुणगण कथनोऽसि ॥ 11॥

प्रभो, आपल्या गुणसमूहांचे गायन परम मंगलमय आहे. ज्यांनी वैराग्याने प्रज्वलित झालेल्या ज्ञानाग्नीच्या द्वारे आपल्या अंतःकरणातील राग-द्वेषादी संपूर्ण मल जाळून टाकले आहेत, तसेच ज्यांचा स्वभाव आपल्यासारखाच शांत आहे, ते आत्माराम मुनीसुद्धा नेहमी आपल्या गुणांचेच गायन करीत असतात.

अथ कथञ्चित्स्खलनक्षुत्पतनजृम्भणदुरवस्थानादिषु

विवशानां(न्) नः(स्) स्मरणाय ज्वरमरणदशायामपि सकल-

कश्मलनिरसनानि तव गुणकृतनामधेयानि वचनगोचराणि भवन्तु ॥ 12॥

म्हणून आम्ही आपल्याकडे एवढीच वर मागतो की, कोठेतरी पडल्यावर, ठेच लागल्यावर, शिंक आल्यावर किंवा जांभई आल्यावर, संकटाचे वेळी, त्याचबरोबर तापाने फणफणलेल्या वेळी अगर मरणासन्नी आम्हांला आपले स्मरण होणे कठीण असले, तरी कोणत्याही प्रकारे का होईना आपल्या सर्व दोषांचा नाश करणाऱ्या 'भक्तवत्सल', 'दीनबंधु' इत्यादी गुणवाचक नावांचे आम्ही उच्चारण करू शकू.

किञ्चायं(म्) राजर्षिरपत्यकामः(फ्) प्रजां(म्)

भवादृशीमाशासान ईश्वरमाशिषां(म्)

स्वर्गापवर्गयोरपि भवन्तमुपधावति प्रजायामर्थप्रत्ययो

धनदमिवाधनः(फ्) फलीकरणम् ॥ 13॥

जसे एखादा कंगाल मनुष्याने धन वाढण्याच्या उद्देशाने पुरुषाकडे जाऊनही त्याच्याकडून केवळ भिक्षाच मागावी, त्याचप्रमाणे हा राजर्षी नाभी संततीप्राप्ती हाच परम पुरुषार्थ मानून आपल्यासारखाच पुत्र व्हावा, या इच्छेने स्वर्गही देऊ शकणाऱ्या आपली आराधना करीत आहे.

को वा इह तेऽपराजितोऽपराजितया मायया

नवसितपदव्यानावृतमतिर्विषयविषरयानावृत-

प्रकृतिरनुपासितमहच्चरणः ॥ 14॥

आपल्या मायेचा अंत कोणालाच लागत नाही आणि ती कोणाला वशही होत नाही. यात काही आश्चर्य नाही. ज्या लोकांनी महापुरुषांच्या चरणांची सेवा केली नाही, त्यांच्यापैकी असा कोण आहे की जो मायेला वश झाला नाही किंवा त्याच्या बुद्धीवर तिने आवरण घातले नाही आणि विषयसुखाच्या वेगाने त्याचा स्वभाव दूषित केला नाही?

यदु ह वाव तव पुनरदभ्रकर्तरिह समाहृत-

स्तत्रार्थधियां(म्) मन्दानां(न्) नस्तद्यद्देवहेलनं(न्) देवदेवार्हसि

साम्येन सर्वान् प्रतिवोढुमविदुषाम् ॥ 15॥

देवाधिदेवा, आपण भक्तांची मनोरथे पूर्ण करता. मंदबुद्धी असा आम्ही कामनेला वश होऊन या पुत्रकामनेसाठी आपल्याला आवाहन केले, हा आमचा अपराधच होय. परंतु आपण समर्थ असल्याने आमच्या या अविचाराबद्दल आम्हांला क्षमा करावी.

श्रीशुक उवाच

इति निगदेनाभिष्टूयमानो भगवाननिमिषर्षभो

वर्षधराभिवादिताभिवन्दितचरणः(स्) सदयमिदमाह ॥ 16॥

श्रीशुकाचार्य म्हणतात – महाराज! वृषभिर्भूतो नाभीच्या पूज्य ऋत्विजांनी प्रभूंच्या चरणांना वंदन करून जेव्हा वेदस्तोत्राने त्यांची स्तुती केली, तेव्हा देवाधिदेव श्रीहरी त्यांची करुणा ऐकून असे म्हणाले.

श्रीभगवानुवाच

अहो बताहमृषयो भवद्भिरवितथगीर्भिर्वरमसुलभ-

मभियाचितो यदमुष्यात्मजो मया सदृशो भूयादिति

ममाहमेवाभिरूपः(ख्) कैवल्यादथापि ब्रह्मवादो न मृषा

भवितुमर्हति ममैव हि मुखं(यँ) यद् द्विजदेवकुलम् ॥ 17॥

श्रीभगवान म्हणाले – ऋषींनो, आपण सर्वजण सत्यवादी महात्मे आहात. राजर्षी नाभीला माझ्यासारखाच पुत्र व्हावा, असा मोठा दुर्लभ वर आपण मागितलात. मुनींनो, माझ्यासारखा तर मीच आहे; कारण मी अद्वितीय आहे. तरीसुद्धा ब्राह्मणांचे वचन खोटे होता कामा नये. कारण ब्राह्मणगुरू म्हणजे माझे मुखच होत.

तत आग्नीध्रीयेऽशकलयावतरिष्याम्यात्मतुल्य- मनुपलभमानः ॥ 18॥

म्हणून मी स्वतःच माझ्या अंशकल आग्नीध्रनंदन नाभीच्या घरी अवतार घेईन. कारण माझ्यासारखा दुसरा कोणीही नाही.

श्रीशुक उवाच

इति निशामयन्त्या मेरुदेव्याः(फ्) पतिमभिधायान्तर्दधे भगवान् ॥ 19॥

श्रीशुक म्हणतात - महारानी मेरुदेवी ऐकत असताना तिच्या पतीला असे म्हणून भगवान अंतर्धान पावले.

बर्हिषि तस्मिन्नेव विष्णुदत्त भगवान् परमर्षिभिः(फ्)

प्रसादितो नाभेः(फ्) प्रियचिकीर्षया तदवरोधायने

मेरुदेव्यां(न्) धर्मान् दर्शयितुकामो वातरशनानां(म्)

श्रमणानामृषीणामूर्ध्वमन्थिनां(म्) शुक्लया तनुवाववतार ॥ 20॥

विष्णुदत्त परीक्षिताब, महर्षींनी त्या यज्ञात अशा प्रकारे प्रसन्न केल्यानंतर महाराज नाभींचे कल्याण करण्यासाठी श्रीभगवंत महारानी मेरुदेवीच्या ठिकाणी दिगंबर संन्यासी आणि ऊर्ध्वरेता मुनींचा धर्म प्रगट करण्यासाठी, शुद्धसत्त्वमय रूपाने प्रगट झाले.

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायां(म्)
पञ्चमस्कन्धे नाभिचरिते ऋषभावतारो नाम तृतीयोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥
ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥